ঃ योगज्ञेश सद्गुरू श्री गुळवणी महाराजांची आरती ঃ

ओवाळिन ओजा, महातेजा, श्रीवामन योगीराजा ॥ धृ ॥

दिव्यानंदाची गुरूमूर्ती, सतेज सुंदर कांती ।
सस्मित सद्‌भावी, मनि घ्यावी, आरती ओवाळावी ॥ 1 ॥

रात्रंदिन पाही मनि राही अष्टऋध्दि सिध्दिही ।
परि नच दावि कधी , ती साधी ओळख श्री प्रेमाब्धी ॥ 2 ॥

श्रीशकंरतीर्थ कल्पतरू लोकनाथ सद्गुरू ।
श्रीवामनराया देवुनियां शक्ती जन ताराया ॥ 3 ॥

सदभावें कोणी आर्त मनीं आठवितांची ध्यानीं ।
प्रत्यय येइ त्वरें शक्तीचा चिंतामणि कलियुगिचा ॥ 4 ॥

डोळे लावुनिया एक ठाया बैसा सोडुनि माया ।
लहरींवर लहरी त्या उठती येई ब्रह्मप्रचिती ॥ 5 ॥

शक्तिसंचार हो स्वैर, षड्रिपु पळती दूर ।
अगम्य अनुभूति निश्चिती , लाभे सुदिव्य कांती ॥ 6 ॥

किती हा कनवाळु , स्नेहाळू , सद्‌भक्तां प्रतिपाळू ।
उदार , करूणाकर , अवतार , श्रीदत्तप्रभू योगीवर ॥ 7 ॥

प्रत्यक्षचि आले दीप्तभले ब्रह्मरूप अवतरले ।
श्रध्दा जैशी ती , ये प्रचिती , साधक दंगचि चित्तिं ॥ 8 ॥

सच्चिदानंद , श्रीकंद , श्रीवासुदेवानंद ।
देई श्रीशक्ती , प्रदीप्त ती , ओवाळू पंचारती ॥ 9 ॥